# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

## पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ अहिल्यारत्न पुरस्कार:नियमावली

कला, संस्कृती, साहित्य, क्रीडा, शिक्षण व संशोधन, सामाजिक, राजकीय, प्रशासकीय, कृषी, उद्योग व व्यापार, पर्यावरण, जल व्यवस्थापन, आदी क्षेत्रांपैकी एका किंवा अधिक क्षेत्रामध्ये जीवनभर विशेष उल्लेखनीय योगदान (Outstanding / Extraordinary Contribution) देणाऱ्या व्यक्तीस पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचा "**अहिल्यारत्न**" पुरस्कार प्रदान करण्यात येईल.

१. **पुरस्काराचे स्वरुप:** रोख रक्कम रु.५१,०००/- (रुपये एकावन्न हजार फक्त) सन्मानपत्र व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकरांचे स्मृतिचिन्ह असे राहील.

२. ज्या पुरस्कार्थींची अहिल्यारत्न पुरस्काराकरिता विद्यापीठाकडून निवड करण्यात येईल असा पुरस्कार्थी हा मूळ भारतीय असणारा परंतु परदेशात स्थायिक झालेला असला तरीही त्यांचा प्रवास, निवास व भोजनासाठी होणारा प्रत्यक्ष खर्च (विमान, कार, रेल्वे यांसह) विद्यापीठ करेल.

३. **पुरस्काराचे वितरण:** "**अहिल्यारत्न**" पुरस्काराचे वितरण विद्यापीठाच्या नामविस्तार दिनाच्या सोहळयावेळी सन्मानपूर्वक प्रदान करण्यात येईल.

४. **नामनिर्देशन पध्दत:**सदरील पुरस्कारासाठी पुरस्कारार्थीची निवड करण्यासाठी मा. कुलगुरु महोदय यांच्या अध्यक्षतेखाली शोध समिती गठीत करण्यात येईल. सदरील समितीची संरचना खालीलप्रमाणे असेल:

**पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ अहिल्यारत्न पुरस्कार शोध समिती**

| | | |
|---|---|---|
| १ | मा.कुलगुरु, पुअहोसोविसो | अध्यक्ष |
| २ | मा.प्र-कुलगुरु, पुअहोसोविसो | सदस्य |
| ३ | मा.कुलसचिव, पुअहोसोविसो | सदस्य |
| ४ | मा.व्यवस्थापन परिषद सदस्य (संस्थाचालक) | सदस्य |
| ५ | मा.व्यवस्थापन परिषद सदस्य (प्राध्यापक) | सदस्य |
| ६ | मा.व्यवस्थापन परिषद सदस्य (पदवीधर) | सदस्य |
| ७ | मा. अधिष्ठाता | सदस्य |
| ८ | मा.कुलगुरु नामनिर्देशित महिला प्रतिनिधी (सामाजिक, शैक्षणिक, प्रशासकीय आदी क्षेत्रातील नामवंत व्यक्ती) | सदस्य |
| ९ | मा. संचालक, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर आध्यासन | सदस्य |

उपरोक्त प्रमाणे समिती "**अहिल्यारत्न**" पुरस्कारासाठी एका व्यक्तीची निवड करुन तशी शिफारस व्यवस्थापन परिषदेकडे करेल. तथापि, शोध समितीस योग्य व्यक्ती न आढळल्यास समिती त्यावर्षी "**अहिल्यारत्न**" पुरस्कारसाठी निरंक अशी शिफारस करेल.

**५. पुरस्कारार्थी नामनिर्देशनासाठीचे विविध क्षेत्र:**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी आपल्या कारकिर्दीत जे नैतिक अधिष्ठान ठेवून लोकोपयोगी राज्य कारभार केला त्यांचा आदर्श मानून खालील क्षेत्रात नाविण्यपूर्ण समाजपयोगी उल्लेखनिय कार्य केलेले असावे.

अ. कला, संस्कृती व साहित्य या क्षेत्रातील उल्लेखनिय कार्ये.

ब. शिक्षण, संशोधन, क्रीडा या क्षेत्रातील उल्लेखनिय कार्ये.

क. सामाजिक, राजकीय, प्रशासन, व्यवस्थापन, महिला सबलीकरण या क्षेत्रातील उल्लेखनिय कार्ये.

ड. कृषी, उद्योग, व्यापार या क्षेत्रातील उल्लेखनिय कार्ये.

इ. पर्यावरण, जलव्यवस्थापन, कौशल्य विकास या क्षेत्रातील उल्लेखनिय कार्ये.

याक्षेत्रात जे कार्य केलेले आहे ते कार्य नाविन्यपूर्ण व समाजोन्नतीचे असावे.

**६. नामनिर्देशनाचे निकष:**

१. सदर पुरस्कारासाठी निवड करण्यात येणाऱ्या व्यक्तीची जनमानसात स्वच्छ प्रतिमा असावी आणि त्यांचे नैतिक अधिष्ठान व कार्य इतरांना मार्गदर्शक ठरावे. ती व्यक्ती निष्कलंक असावी आणि त्यांच्याविरुध्द कसल्याही प्रकारच्या फौजदारी स्वरुपाच्या गुन्हयाची नोंद नसावी.

२. पुरस्कारासाठी निवड करण्यात येणाऱ्या / नामनिर्देशित करण्यात येणाऱ्या हयात व्यक्तीचे वय ६० वर्ष पुर्ण किंवा त्यापेक्षा अधिक असावे.

३. पुरस्काराची व्याप्ती ही राष्ट्रीय स्तरापर्यंत असेल.

४. पुरस्कार विभागून दिला जाणार नाही.

५. पुरस्कारासाठी पात्र व्यक्ती आढळून न आल्यास पुरस्कार त्यावर्षी घोषित केला जाणार नाही.

६. सदर पुरस्कार मरणोत्तर जाहिर करण्यात येणार नाही.

**७. इतर माहिती:**

पुरस्काराच्या निवडीसाठी शोध समिती त्या-त्या क्षेत्रावर निर्देशित समकक्ष पातळीवर कसोट्या लावून **"अहिल्यारत्न"** पुरस्कारासाठी एका व्यक्तीची व्यवस्थापन परिषदेकडे शिफारस करेल. व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेनंतर पुरस्कार जाहिर करण्यात येईल.